# Jowar Plantation Scheme for Food Security

Agrowon, July 14, 2009

## अन्नसुरक्षिततेसाठीच ज्वारी लागवड उपक्रम : सतीश

**वर्धा (प्रतिनिधी)** : देशात धान्यसाठा असणे ही 'अन्नसुरक्षा' नसून घरोघरी भरपूर धान्यसाठा असणे, हीच खरी 'अन्नसुरक्षा' आहे. गाव विकायला काढणाऱ्या डोरली येथील शेतकऱ्यांनी ज्वारी लागवडीचा घेतलेला निर्णय, तेथील पुढील उपक्रमांचे नियोजन डोरली गावाला अन्नसुरक्षा देईल. पुढे याच गावापासून विदर्भाचे अन्नसमृद्धीचे नवे भविष्य सुरू होईल, असे आंध्र प्रदेशातील डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीचे संचालक पी. व्ही. सतीश यांनी मंगळवारी (ता. १४) पत्रकार परिषदेत सांगितले. शेतकरी नेते विजय जावंधिया या वेळी उपस्थित होते.

डोरलीच्या शेतकऱ्यांनी पुन्हा जुन्या पीक पद्धतीकडे वळत किमान ६० एकरांत ज्वारीची लागवड केली आहे. या लागवडीची पाहणी करण्याकरिता श्री. सतीश येथे आले होते. डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीच्या वतीने ज्वारीची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांना एकरी दोन हजार रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. हे शेतकरी ज्वारीचे पीक हाती आल्यानंतर त्यातील एक क्विंटल किंवा परिस्थितीप्रमाणे ज्वारी गावाच्या धान्यकोशाकरिता देतील. पुढे ही ज्वारी गावातील गरजू शेतकऱ्यांना विकत देण्यात येईल. त्यातून येणाऱ्या रकमेचा गावाला बँकेप्रमाणे मदत देण्यास उपयोग होईल. ही ग्रामसमृद्धी डोरली गावाचा नवा आदर्श उभा करेल, असे श्री. सतीश यांनी सांगितले.

पंतप्रधान मनमोहनसिंग यांच्या वायफड भेटीत शेतकरी नेते विजय जावंधिया यांनी ज्वारी पिकविणाऱ्या शेतकऱ्यांना एकरी एक हजार रुपयांचे अनुदान द्यावे, अशी मागणी केली होती. ही मागणी श्री. सतीश यांच्यापर्यंत गेली आणि त्यांनी श्री. जावंधिया यांच्याशी संपर्क साधून ही योजना डेक्कन डेव्हलपमेंट सोसायटीमार्फत एकरी दोन हजार रुपयांचे अनुदान देऊन राबविण्याचे ठरविले.

ज्वारीच्या पेरणीतून शेतकऱ्याचा शेती आणि अन्नधान्याचा प्रश्न आम्ही सोडवीत आहोत. यामुळें त्याचा आत्मसन्मानही वाढणार आहे. आंध्र प्रदेशातील मेदक जिल्ह्यातल्या १५० गावांतील पडीक जमिनीत महिला शेतकऱ्यांनी हा प्रयोग सुरू केला आहे. तेथे ज्वारीचे रेशनकार्ड आहे. १९९६-१९९७ मध्ये ३२ गावांत सुरू झालेला हा प्रयोग सध्या तेथील १५० गावांत पोचला. डोरली हे १५१ वे गाव आहे, असे श्री. सतीश यांनी सांगितले.